| MHAM120015492022 | | |
|---|---|---|
| | खटला दाखल दिनांक | २८/०६/२०२२ |
| | खटला नोंदणी दिनांक | २८/०६/२०२२ |
| | खटला निकाल दिनांक | ०५/०६/२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस<br>०३ ११ ०८ |

भाग-अ

| दर्यापूर येथील अतीरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, यांचे न्यायालयात<br>(पीठासीन अधिकारी : आशिष एम. जोशी ) | |
|---|---|
| नियमित फौजदारी खटला क्रमांक - ८५/२०२२ | निशाणी ३९ |
| प्रथम खबर/गुन्हा आणि पोलिस ठाणे<br>गुन्हा क्रमांक ४०६/२०२२, दिनांक ३०/०५/२०२२, भा.द.वी. चे कलम ३२४, ५०४, ५०६ व सह कलम ३४ अन्वये, दर्यापूर पोलिस स्टेशन, ता. दर्यापूर, जि. अमरावती. | |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र सरकार,<br>व्दारा पोलिस ठाणे अंमलदार,<br>दर्यापूर पोलीस स्टेशन, ता. दर्यापूर, जि. अमरावती |
| अभियोगपक्षातर्फे अभियोक्ताः- | श्रीमती बेलसरे |
| आरोपी | १. अमोल उर्फ राहूल प्रल्हादराव जामनिक<br>वय – ३३ वर्षे, धंदा- मजूरी<br>२. रमाबाई प्रल्हादराव जामनिक<br>वय – ६० वर्षे, धंदा- मजूरी<br>दोन्ही राहणार –<br>कळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती. |
| आरोपीतर्फे वि. विधीज्ञः- | श्री. एस.जी.कोल्हे |

भाग-ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २९/०५/२०२२ |
| गुन्हा दाखल झाल्याचा दिनांक | ३०/०५/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | २८/०६/२०२२ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०७/०८/२०२३ |
| प्रकरण पुराव्याला निश्चीत केल्याचा दिनांक. | १८/०३/२०२४ |

| | |
|---|---|
| प्रकरण न्यायनिर्णया करिता निश्चीत केल्याचा दिनांक | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०५/०६/२०२६ |
| शिक्षेचा आदेश दिल्याची दिनांक, इतर काही | --- |

## आरोपी बाबतचा तपशील

| आरोपी क्रमांक. | अरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख. | जामीनावर सोडल्याची तारीख. | दाखल गुन्हा. | शिक्षा किंवा दोषमुक्त केले ? | दिलेली शिक्षा. | प्रकरणा दरम्यान तुरुंगात असल्याचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.स. साठी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमोल उर्फ राहूल प्रल्हादराव जामनिक | समजपत्रावर रिहा. | ०२/०७/२०२२ | भा.द.वी. कलम ३२४, ५०४,५०६ अन्वये | निर्दोष | निर्दोष | नाही. |
| २. | रमाबाई प्रल्हादराव जामनिक | समजपत्रावर रिहा. | ०२/०७/२०२२ | --''-- | निर्दोष | निर्दोष | नाही. |

## न्यायनिर्णय

**( आज दिनांकः- ०५ जून, २०२६ रोजी उद्घोषित )**

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४,५०६ अन्वये दोषारोप ठेऊन खटला चालविण्यात आला.

२) अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की, दिनांक २९/०५/२०२२ रोजी रात्री ०९.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी उज्वल हा त्याची मोटार सायकल दुरूस्ती करीता घेवून अनिल जामनिक याच्या घराकडे जात असताना आरोपी क्र. ०२ हिने त्याला पाठीमागून रेती फेकून मारली. गावातील गौरव राणे याने फिर्यादीला शाळा सुरू झाल्याबाबत मुनादी देण्याचे सांगितले होते. फिर्यादी मुनादी देत असताना त्याने आरोपी क्र. ०२ हिला ''रेती का मारली'' असे विचारले असता आरोपी क्र. ०१ हा हातामध्ये काठी घेवून आला व ती काठी त्याने फिर्यादीच्या डोक्यात मारली. त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटले व त्याला रक्ताची जखम झाली. त्यावेळी तिथे हजर असलेले उमेश चक्रनारायण व छोटू चक्रनारायण यांनी भांडण सोडविले. त्यावेळी दोन्ही आरोपी हे फिर्यादीला मारहाण करून

जिवे मारण्याची धमकी देत होते. त्यानंतर फिर्यादीने उमेश चक्रनारायण व छोटू चक्रनारायण याच्यासोबत पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. सदर फिर्यादवरून पोलीस स्टेशन दर्यापूर येथे आरोपींविरूध्द अपराध क्रमांक ४०६/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

३**)** सदर गुन्ह्याचा तपास नाईक पोलीस कॉन्स्टेबल श्री. प्रभाकर डोंगरे यांच्याकडे वर्ग करण्यात आला. त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवीले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले आणि तपास संपल्यानंतर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४**)** सदर प्रकरणात माझ्या वि. पूर्वाधिकाऱ्यांनी निशाणी १२ वर उपरोक्त कलमांखालील गुन्ह्यांकरीता तपशिल नोंदविला. सदर दोषारोप आरोपींना वाचुन व समजावून सांगण्यात आला असता आरोपींनी गुन्हा नाकबुल असल्याचे सांगुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५**)** अभियोगपक्षातर्फे एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. त्याबाबत परिशिष्ठामध्ये नमुद केले आहे. त्यानंतर निशाणी क्र. १ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येवून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे आरोपींचे जवाब अनुक्रमे निशाणी ३७ व ३८ नोंदविण्यात आले.

६**)** अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे पुढील मुद्दे न्यायनिर्णयासाठी विचारार्थी उद्भवतात. सदर मुद्द्यांची उत्तरे मी कारणमिमांसा व विवेचनाव्दारे पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक २९/०५/२०२२ रोजी २१.०० ते २१.३० वाजताचे सुमारास ग्राम कळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीला काठी या घातक हत्याराने डोक्यावर मारहाण करून त्याला इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीचा उद्देशपुर्वक | |

| | | |
|---|---|---|
| | अपमान व्हावा व शांतता भंग करण्यास प्रक्षोभन मिळावे याची माहीती असतांना सुध्दा बिभस्त भाषेत शिवीगाळ करून त्याला प्रक्षोभीत केले व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला ? | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**: का र ण मि मां सा :**

मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत **: -**

७**)** सर्व मुद्दे एकमेकांची सलग्न असल्याने ते एकाच वेळी चर्चेसाठी घेण्यात आले आहे. आरोपींविरुध्द खटला सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाला प्रथमत: असे सिध्द करावे लागेल की, घटनेच्या दिवशी आरोपींनी फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण करून अश्लील शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली.

८**)** वर नमुद बाबी सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी/जखमी साक्षीदार क्रमांक १ उज्वल चक्रनारायण याची साक्ष निशाणी १८ वर नोंदविली आहे. त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले की, तो दोन्ही आरोपींना ओळखतो. घटना दिनांक २९.०५.२०२२ रोजी रात्री ०९.३० वाजेच्या सुमारास घडली होती व त्यावेळी तो त्याची मोटार सायकल दुरूस्तीकरीता घेवून जात होता. त्यावेळी आरोपी क्र. ०२ हिने त्याला पाठीमागून रेती फेकून मारली. गाडी दुरूस्त केल्यानंतर तो दवंडी देण्याकरीता जात असताना त्याने आरोपी क्र. ०२ हिला विचारले की, ''तू मला जात असताना रेती का मारली''. त्यावेळी आरोपी क्र. ०१ अमोल याने पाठीमागून येवून लाठीने त्याच्या डोक्यावर मारले. त्यामुळे त्याच्या डोक्याला रक्ताची जखम झाली. तसेच त्यावेळी दोन्ही आरोपींनी त्याला शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. घटनेच्या वेळी त्याचा भाऊ उमेश दयाराम चक्रनारायण व छोटू दयाराम चक्रनारायण तिथे हजर होते व त्यांनी भांडण सोडविले.

९) त्याच्या साक्षीत पूढे असे आले आहे की, त्यानंतर तो उमेश दयाराम चक्रनारायण व छोटू दयाराम चक्रनारायण यांच्यासोबत पोलीस ठाण्यात गेला व फिर्याद निशाणी १९ दिली. तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी त्याला उपचाराकरीता सरकारी दवाखान्यात पाठविले होते. मारहाणीमुळे त्याच्या डोक्याला टाचे पडले होते व तो दोन दिवस दवाखान्यात भरती होता. त्यानंतर ०१ तारखेला त्याने पोलीसांना दाखविलेल्या घटनास्थळाचा पोलीसांनी पचंनामा केला. ज्या काठीने त्याला मारहाण झाली होती ती काठी वस्तू 'अ' वर आहे.

१०) घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उमेश चक्रनारायण याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, तो फिर्यादी व आरोपींना ओळखतो. फिर्यादी हा त्याचा भाऊ आहे. वादातील घटना दिनांक २९.०५.२०२२ रोजी रात्री ०९.०० वाजेच्या सुमारास घडली होती व ती घटना त्याने प्रत्यक्ष पाहीली होती. त्यादिवशी आरोपी क्र. ०२ हिने त्याचा भाऊ उज्वल याला वाळू फेकून मारली होती. त्यानंतर आरोपी क्र. ०२ राहूल प्रल्हाद जामनिक याने धावत येवून लाकडी बांबूने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचे डोके फूटून रक्त निघाले होते. त्यानंतर उज्वल याने पोलीस ठाण्यात जावून रिपोर्ट दिला. ज्या काठीने फिर्यादीला मारहाण झाली होती ती काठी वस्तू 'अ' वर आहे.

११) घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार क्र. ०३ रोशन याने अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, तो फिर्यादी व आरोपींना ओळखतो. दिनांक ०१.०६.२०२२ रोजी पोलीसांनी त्याला पंच म्हणून बोलाविले नव्हते व त्याच्यासमक्ष काहीही कारवाई केली नाही. पोलीसांनी केवळ कोऱ्या कागदावर त्याची सही घेतली होती. त्याने पंचनाम्यावरील त्याची सही मान्य केली परंतू त्यातील मजकूराबाबत त्याला काहीही माहीती नाही. त्याने अभियोग पक्षास सहाय्य न केल्याने अभियोग पक्षाने त्याचा सखोल उलट तपास नोंदविला. परंतु, त्याच्या उलटतपासातून सुध्दा अभियोग पक्षास मदत होईल असे काहीही समोर आलेले नाही.

१२) घटनेचा दुसरा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार छोटू चक्रनारायण याच्या साक्षीत असे आहे की, तो आरोपीला ओळखतो व फिर्यादी हा त्याचा चुलत भाऊ आहे. वादातील घटना दिनांक २२.०५.२०२२ रोजी रात्री ०९.३० वाजेच्या सुमारास आरोपी अमोल जामनिक याच्या घरासमोर घडली होती. त्यावेळी तो घरी जात असताना त्याला भांडणाचा आवाज

आल्याने तो घटनास्थळी गेला असता फिर्यादी हा खाली पडलेला होता व त्याच्या डोक्यातून रक्त निघत होते. आरोपी क्र. ०१ याने फिर्यादीला मारहाण केली होती परंतू सदरची मारहाण त्याच्यासमक्ष झाली नव्हती. त्यानंतर त्याने घरून गाडी आणली व फिर्यादीला उपचाराकरीता दर्यापूर येथे नेले.

**१३)** त्याने अभियोग पक्षाला पूर्णपणे साह्य न केल्यामुळे वि. सहा. सरकारी अधिवक्त्यांनी त्याचा सखोल उलट तपास घेतला असता त्याने हे मान्य केले की, फिर्यादी व रमाबाई यांच्यामध्ये रमाबाई हिने रेती फेकून मारल्याच्या कारणावरून वाद झाले होते, त्यावेळी रमाबाई हिने फिर्यादीला शिविगाळ केली होती, अमोल घटनास्थळी आला व त्याने फिर्यादीच्या डोक्यावर मारले व त्यामुळे त्याचे डोके फुटून रक्त निघाले होते. मात्र आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने घटना त्याच्यासमक्ष घडली नसल्याचे व नंतर त्याला घटनेबाबत माहिती पडल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदरचा साक्षीदाराची साक्ष विश्वसनिय वाटत नाही.

**१४)** वैद्यकीय अधिकारी डॉ. चौधरी यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक २९.०५.२०२२ रोजी ते उप-जिल्हा रूग्णालय, दर्यापूर येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी पोलीस कॉन्स्टेबल अजीनाथ ब.नं. २५७५, पो.स्टे. दर्यापूर यांनी रूग्ण उज्वल याला वैद्यकीय तपासणीकरीता आणले होते. त्यांनी रूग्ण उज्वल याची वैद्यकीय तपासणी केली असता २ x ०.५ से.मी. आकाराची एक फाटलेली जखम आढळून आली व त्यातून रक्तस्त्राव होत होता. ती जखम ताज्या (fresh) स्वरूपाची होती व ती कठीण व बोथड वस्तूमुळे झाली होती. त्यानंतर त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी ३१) निर्गमित केले. त्यांच्या अभिप्रायानूसार (निशाणी ३२) रूग्णाला झालेली जखम ही लाकडी काठीमुळे होवू शकते. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये त्यांनी हे मान्य केले आहे की, वैद्यकीय प्रमाणपत्र निशाणी क्र. ३१ मध्ये नमूद केलेल्या जखमा या कठीण व बोथड वस्तूवर खाली पडल्यामुळे होवू शकतात.

**१५)** साक्षीदार क्र. ०६ अन्वेषण अधिकारी श्री. डोंगरे यांच्या साक्षीत असे आले आहे की, तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले, वैद्यकीय अधिकारी यांना पत्र

निशाणी ३२ दिले, आरोपीला समजपत्र दिले व तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

**१६)** आरोपीच्या वि. विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असा बचाव घेतला की, प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उमेश दयाराम चक्रनारायण हा फिर्यादीचा भाऊ आहे. त्यामुळे त्याने फिर्यादीच्या सांगण्यावरून साक्ष दिलेली आहे. तसेच प्रस्तूत प्रकरणातील फिर्याद ही जून्या वादाच्या कारणाने दिलेली आहे. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

**१७)** घटनास्थळ व जप्ती पंच रोशन याने अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ साक्ष न दिल्याने अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामे सिध्द करू शकलेला नाही. त्यामुळे प्रकरणातील जप्त शस्त्र काठी ही आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आली होती, ही बाब नि:संशयपणे सिध्द होत नाही.

**१८)** फिर्याद (निशाणी १९) व फिर्यादीच्या साक्षीनूसार फिर्यादीने आरोपी क्र. ०२ हिला ''तू मला जात असताना रेती का मारली'' असे विचारले असता त्यावेळी आरोपी क्र. ०१ अमोल याने पाठीमागून येवून लाठीने त्याच्या डोक्यावर मारले व त्यामुळे त्याच्या डोक्याला रक्ताची जखम झाली. तसेच त्यावेळी दोन्ही आरोपींनी त्याला शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. घटनेच्या वेळी त्याचा भाऊ उमेश दयाराम चक्रनारायण व छोटू दयाराम चक्रनारायण तिथे हजर होते व त्यांनी भांडण सोडविले व पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्याकामी त्याच्यासोबत आले होते. मात्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र. ०२ उमेश याने त्याच्या साक्षीमध्ये तो फिर्यादीसोबत पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्याकामी त्याच्यासोबत गेला असल्याची बाब सांगितलेली नाही. उलट त्याने असे कथन केले आहे की, घटनेनंतर फिर्यादी उज्वल याने पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली होती.

**१९)** दुसरा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र. ०२ उमेश चक्रनारायण याने फिर्यादीच्या साक्षीतील काही बाबींना अनूसरून साक्ष दिलेली आहे. परंतू त्याची साक्ष पाहता फिर्यादी हा त्याचा भाऊ आहे. तसेच त्याने पोलीसांना दिलेल्या बयानातील रेखांकीत भाग 'अ' पाहता

त्याने ''अनिल जामनिक'' याने फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण केल्याचे सांगितले आहे. परंतू अभियोग पक्षातर्फे ''अनिल जामनिक'' नावाचा कोणीही आरोपी या प्रकरणामध्ये नाही.

**२०)** फिर्यादीच्या साक्षीनूसार उमेश व छोटू यांनी त्याचे भांडण सोडविले होते, फिर्यादी देते वेळी ते दोघे त्याच्यासोबत पोलीस स्टेशनला हजर होते. परंतू साक्षीदार उमेश याने फिर्यादी व आरोपींचे भांडण त्याने सोडविल्याबाबत काहीही सांगितलेले नाही. तसेच फिर्याद देते वेळी तो व छोटू फिर्यादीसोबत पोलीस स्टेशनला हजर होता व रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांनी फिर्यादीला सरकारी दवाखान्यात पाठविले होते, इत्यादी बाबी त्याच्या साक्षीत येणे अपेक्षित होत्या, परंतू त्या त्याच्या साक्षीत आलेल्या नाहीत. तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार छोटू याचा अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने वादातील भांडण त्याने व उमेश चक्रनारायण यांनी सोडविल्याचे नाकारले आहे. त्यामुळे घटनेच्या वेळी उमेश चक्रनारायण हा तिथे हजर होता व त्याने फिर्यादीचे व आरोपींचे भांडण सोडविले याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपीतर्फे घेण्यात आलेला बचाव व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उमेश व छोटू यांच्या साक्षीचा उहापोह पाहता साक्षीदार उमेश हा घटनेच्या वेळी घटनास्थळी हजर होता व त्याच्यासमक्ष आरोपींनी फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब नि:संशयपणे सिध्द होत नाही.

२१**)** अभिलेखावर आलेला संपूर्ण साक्षी पुरावा पाहता घटेनच्या वेळी आरोपींनी फिर्यादीला नेमक्या कोणत्या शब्दात शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे स्पष्टपणे समोर आलेले नाही. तसेच फिर्यादीच्या साक्षीला पूर्णपणे दुजोरा देणारा कोणत्याही साक्षीदाराचा सुस्पष्ट पूरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच आरोपींविरूध्द पूर्व वैमनस्यातून फिर्यादीने सदर रिपोर्ट दिला असल्याचा बचाव, या सर्व बाबी विचारात घेता घटनेच्या वेळी आरोपींनी फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सुस्पष्ट पुराव्याअभावी नि:संशयपणे सिध्द होत नाहीत. त्यामुळे आरोपीविरूध्द लावण्यात आलेल्या कलमांतील संपूर्ण घटक नि:संदीग्धपणे सिध्द झालेले नाही. म्हणून त्यांना संशयाचा फायदा देवून त्यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष

मुक्तता करणे न्यायोचीत ठरेल असे माझे मत आहे. परिणामत: मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१) दोन्ही आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ३२४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ खालील अपराधांतून पूराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) जप्त मुद्देमाल- (१) एक लाकडी काठी जिची लांबी ३७ इंच ही मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर ती नियमानूसार नाश करण्यात यावी.

४) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ अन्वये अनुक्रमे नि.क्र.४० ते ४१ वर दिलेली बंधपत्रे आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीकरीता वैध राहतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

ASHISH MOHAN JOSHI

Digitally signed by ASHISH MOHAN JOSHI
Date: 2026.06.05 16:31:38 +0530

दिनांक : ०५/०६/२०२६

( आशिष एम. जोशी )
अतीरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
दर्यापूर.